I J R S S I S, Special Issue (V) Oct. 2025: 222-227
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणात समाजमाध्यमांची प्रमुख भूमिका

**रामेश्वरी ग. रंगारी**
एस. चंद्रा. महिला महाविद्यालय साकोली, जि – भंडारा
*Corresponding Author : rameshwarirangari42 @gmail.com

Communicated : 06.09.2025 | Revision : 15.09.2025 | Accepted : 25.09.2025 | Published: 15.10.2025

**सारांश :**
सध्या भारतात समाज माध्यमांमुळे घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे देशभरातील शहरी तसेच ग्रामीण भागांमधील समाजात भोगवादाला स्थान दिल्याचे दिसुन येते भोगवाद घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे या बदला मागे समाज प्रसारमाध्यमं, प्रभाव बदलती सामाजिक मुल्ये, महिलांचे वाढते आर्थिक स्वातंत्र्य आणि पारंपारिक लिंग भूमिका मधील बदल ही प्रमुख कारणे आहेतच शिवाय प्रसार माध्यामांमुळे वृत्तपत्रे , रेडिओ सिनेमा इत्यादी जी लोकमाध्यमे आहेत त्याचाही परिणाम व्यक्तीच्या सामाजिक भावनिक जडणघडणीवर विकासावर होत असतो हे लक्षात घ्यावयास हवे सिनेमातून अश्लीलता किंवा मारपीटीचे तसेच भोगवादी विलासी जीवनाचे दृष्य सातत्याने मुलांच्या पाहण्यात आली तर कळत नकळत मुलांच्या सामाजिक विकासावर त्याचा परिणाम होऊ शकतो त्यामुळे सिनेमा दूरदर्शन इत्यादी लोकं माध्यमांनी आणि शक्यतेवर अपराधी वृत्ती लुटालूट , मारपीठ , विलासीपद्धतीचे जीवन इत्यादी प्रकारची कथा नक्की दाखवू नयेत वृत्तपत्रांमध्ये देखील शोध पत्रकारितेचे अवडंबर माजविण्यात आलेली आहे त्याचेही परिणाम व्यक्तीच्या सामाजिक विकासावर चांगले होऊ शकत नाही . वाढत जाणाऱ्या घटस्फोटाच्या समस्येच्या दुष्परिणामावर लगेच उपाय योजना करून सामाजिकदृष्ट्या समतोल राखणे आवश्यक बाब झाली आहे.

**प्रमुख शब्द** : डिजिटल युग, समाज माध्यम, घटस्फोट, कुटुंब.

**प्रस्तावना :**

कौटुंबिक जीवनाचा मूलभूत पाया म्हणजे पती-पत्नी मधील परिपूर्ण परिपक्व असे नातेसंबंध होय . लग्नाचा विचार प्रत्येकालाच करावा लागतो लग्न केव्हा करावे ही ज्याचे त्याच्या परिस्थितीवर आणि मनावर अवलंबून असते म्हणजेच व्यक्ती परत्वे निर्णय असू शकतो . विवाह म्हणजे यशस्वी जीवन सहजीवन घालविण्याचा तो एक समाज संमत मार्ग आहे . विवाहात दोन भिन्नलिंगी व्यक्ती एकत्र येतात लग्नासंबंधीच्या कल्पना दोघांच्याही जोडीदारांच्या सारख्या असाव्यात विवाह म्हणजे पोरखेड नव्हे तर ती एक महत्त्वपूर्ण बाब आहे . उत्सुकता, जिज्ञासा जबाबदारीची ओळख वैचारिक पातळी या सर्व बाबी विवाहसंबंध यशस्वी ठरविण्यात मोलाची भर घालतात. पती-पत्नी संबंध विवाह यशस्वी होण्यामागे हक्क आणि अधिकार याचबरोबर जबाबदारीची जाणीव असेल तर वैवाहिक जीवन सुखी होऊ शकेल. परस्परांना समजून घेणे आर्थिक सहकार्य करणे हे विवाहातील महत्त्वाचे मूलभूत घटक आहेत आपल्या वैवाहिक जीवनामध्ये सुख आणि समृद्धी दिवसेंदिवस यशस्वी व्हायला पाहिजे यासाठी विवाहित व्यक्तींना काही नवीन गोष्टी शिकाव्या लागतात तर काही गोष्टींचा त्याग करावा लागतो . आजच्या

डिजिटल युगात समाज माध्यमे दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत .व्यक्तीला नातेवाईकांशी संवाद साधने, माहिती मिळवणे आणि मनोरंजन करणे यासाठी लोक समाज माध्यमांवर अवलंबून आहेत दूरदर्शन, टेलिफोन, मोबाईल, फेसबुक, व्हाट्सअप इत्यादी समाज माध्यमांच्या अतिरेकामुळे नात्यांमध्ये गैरसमज, अविश्वास आणि मानसिक तणाव निर्माण झाले आहेत. कुटुंबात कलह होऊन घटस्फोटांच्या वाढत्या प्रकरणामुळे ही एक सामाजिक समस्या उद्यास आली आहे . महाराष्ट्रात समाज माध्यमांमुळे घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहेत 18% टक्के घटस्फोटाचे कारण हे केवळ समाज माध्यमे असून हा आकडा दिवसा गणित वाढत चालला आहे .

**कोणत्या राज्यात सर्वाधिक घटस्फोट होत आहे**

जगाला जोडणाऱ्या सोशल मीडियामुळे महाराष्ट्रात घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहेत गेल्या तीन वर्षांमध्ये पती-पत्नीमध्ये घटस्फोट होण्याच्या घटना तीन पटीने वाढ झाली आहे " एडजुला लिगल्स गुगल ॲनालिटीक 2025 " च्या अहवालानुसार - 20% टक्के लोक फेसबुक वर वाढल्यानंतर घटस्फोटाचे प्रमाण 2.18 वरून 4.32 प्रति हजार असे वाढले आहेत ज्यात महाराष्ट्रात हे प्रमाण 18.7% टक्के आहे तर कर्नाटकात 11.7 % टक्के पश्चिम बंगाल मध्ये 8.2% दिल्लीत 7.7% तामिळनाडू मध्ये 7. 1% टकके तेलंगणा 6 .7% , केरळ 6.3 % व राजस्थान मध्ये हे प्रमाण 2.5% टक्के इतके आहे मुंबई, बंगळूर, कलकत्ता ,लखनऊ , हैदराबाद यासारख्या मोठ्या शहरांमध्ये अलीकडील वर्षात घटस्फोटांच्या अर्जांची संख्या तीन पटीने वाढली आहे . 'कंम्प्युटर्स इन ह्यूमन बिहेवियर' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. फेसबुक, इंस्टाग्राम आणि ओटीपी वरील माहिती ही नात्यांमध्ये दुरावा निर्माण करण्यास कारणीभूत आहे .

**कोणत्या वयोगटातील जोडप्यात सर्वाधिक घटस्फोट होत आहेत.**

वयोगटाचा आढावा घेण्यात आला ज्यामध्ये 18-24 वयोगटात हे प्रमाण 27.6% टक्के आहे तर 25-34 मध्ये 25 .1% तर 35 -44 वयोगटात 16.2 % आहे तर 45-54 वयोगटात हे प्रमाण10% 55-64 वयोगटात 7% व 65 वयोगटात हे प्रमाण 5% इतके असल्याचे दिसून येत आहे वयोगटातील व्यक्तींच्या घटस्फोटाचे प्रमाण हे 35% टक्के तर 18 ते 25 पर्यंतच्या वयोगटातील 27% घटस्फोटाचे प्रमाण आहे .

**पती पत्नीसंबंध बिघडण्याची कारणे**

१ ) जोडीदाराचे अयोग्य निवड

2) पहिल्या वर्षात / पहिल्या पाच वर्षातच उद्भवणाऱ्या समस्यांना समर्थपणे तोंड देण्याची पती-पत्नीची असंमर्थता

3) जीवनाचे साफल्य / समग्र सुख मिळविण्यासाठी विवाह हा एक मार्ग आहे अशी रोमांचित कल्पना

4) विवाहत्तर अनेक समस्या निर्माण होतात याची जाणीव नसणे

5) समस्यांना तोंड देण्यास शारीरिक मानसिक तयारी नसणे

6) जोडप्यांमधील वयातील जास्तीचा फरक

7) विवाह नंतर पती-पत्नींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात समस्या निर्माण होतात . उदाहरणार्थ लैंगिक समायोजन ही महत्त्वाची समस्या होईल त्यानंतर त्यातून अनेक समस्या निर्माण होतात गर्भसंभावण्याची शक्यता, गरोदरपणा जन्म , अपत्यसंगोपन इ.

**घटस्फोटाची व्याख्या -** " घटस्फोट म्हणजे मंगल विवाह निमित्ताने ब्राह्मणांच्या आणि आप्तेष्टांच्या साक्षीने बसविलेल्या घटाचा भंग होय . विवाह संबंधाचे विच्छेदन होय तसेच पती-पत्नी मधील संभोग बंद करणे होय "

**घटस्फोटाची कारणे**

1) **मानसिक विकार** -जीर्ण मनोभाजनामुळे माणसाचे मन कायमची मरते व ती व्यक्ती माणसातून उठते त्याचे बोलणे चालणे विक्षिप्त किडस वाणी आणि चीड आणणारी असते वारंवार उन्मादाचे झटके येणाऱ्या रुग्णाच्या हातचा मार खाणे सतत आरडा ओरड एकणी रात्रभर त्याच्या करिता जागत राहणे शिवाय दवाखान्याचा खर्च कसा भागवायचा याच्या कायम चिंतेत असणे हे सर्व चीड आणणारेच आहे

2)**अविचारी विवाह** - 90% टक्के विवाह आजकाल उतावीळपणात केलेले असतात ध्येयवाद नसल्यामुळे ते विवाह मोडकळीस येतात . आधुनिकतेच्या नावाखाली वडील मंडळींचा चौकस अनुभव जुगारून देऊन स्वतःच्या निर्णयामुळे बऱ्याच मुला मुलींवर उत्तर आयुष्यात पश्चाताप होण्याची पाळी येते . प्रेम विवाह ,आंतरजातीय विवाह , प्रथम दर्शनी विवाह , नुसतं रूप पाहून होणारी विवाह , विशेष चौकशी न करता ऐकिव माहितीवर आधारलेली विवाह घटस्फोटाला कारणीभूत ठरतात

3) **समाजमाध्यमे** -आजकाल सिनेमा करण्याच्या अंधानूकरणामुळे आंतरजातीय आंतरप्रांतीय प्रेम विवाह होताना दिसतात प्रगती करण्याची निशाणी म्हणून प्रसंग विषयी अशा विवाहाचे कौतुक होते परंतु नव्याची नवलाई संपताच पती-पत्नीच्या खाण्यापिण्याच्या सवयी इतर सवयी सासर माहेरचे आप्त मंडळी इत्यादी कारणावरून कुरबुर सुरू होते या बेबनामाला आगीत तेल ओतणारी भेटली की त्याची परिणती विवाह विच्छेदनात होणे अपरिहार्य असते

4)**पती-पत्नींचा एकमेकांवर विश्वास नसणे** -पती-पत्नी यांचा परस्परावरील दुर्धम्य विश्वास एकमेकांवरील निष्ठा हा आपल्या विवाह संस्थेचा मूलभूत पाया आहे जन्मोजन्मी हाच पती दे म्हणून प्रार्थना करणारी आर्य स्त्री आमचा आदर्श मानली जाते बदलत्या परिस्थितीत हे झुकते माप एकतर्फी राहून चालणार नाही त्यासाठी पुरुष आणि स्त्रियांच्यातील समानता गृहीत धरून पुरुषांनी काही निर्बंध स्वतःवर खुशीने लागून घेतले पाहिजे. स्त्रीचे क्षेत्र हे चूल व मूल एवढेच मर्यादित न राहता तिची बुद्धिमत्ता व्यवहारिक चाणाक्षपणा , जिद्द, हिशोबी स्वभाव इत्यादी गुनाचा हातभार संसाराच्या यशाकडे लागला पाहिजे एकमेकांच्या दोषावर पांघरून घातले पाहिजे ही भावनां ज्या ठिकाणी नसेल तेथे घटस्फोट होत असतो

5) **वयातील अंतर** - याशिवाय जोडप्या मधील वयातील फरक देखील वैवाहिक समायोजनावर प्रभाव पाडत असल्याचे दिसून आले आहे .ज्यात वयातील फरक असलेल्या जोडीदारांना समायोजनाच्या मोठ्या

समस्यांचा अनुभव आला आहे. ज्यात पत्नी आठ ते दहा वर्षांनी जर लहान असली तर ती नवीन पिढीची प्रतिनिधी असते ती फेसबुक व्हॉट्सअप वर जास्त क्रियाशील सहज वापरत असते . तिला इतरांसारख्या पोस्ट टाकणे, रिल्स बनवायला आवडते सारमाध्यमावर जास्त क्रियाशील असल्यामुळे नवऱ्याला तिच्या अशा वागण्यावर आक्षेप असतो लोकांनी तिच्या पोस्ट रिल्स वर केलेल्या प्रतिक्रिया नवऱ्याला आवडत नाही व तो तिच्या संदर्भात संशय वृत्ती बाळगून ठेवतो व अश्या परिस्थितित घटस्फोट अटळ ठरतो .

**घटस्फोटाची कायदेशीर आवश्यकता**

घटस्फोट ही भीषण समस्या आहे या समस्येला तोंड द्यायचे झाल्यास शक्ती एकवटून जीवन जगावे लागते. घटस्फोटाची समस्या निर्माण होण्यामागे मनाची अस्थिरता, असमंजसपणा, दुसऱ्याला समजून न घेण्याची प्रवृत्ती अशा अनेक गोष्टीचा त्यात अंतर्भाव आहे घटस्फोट हा जीवन जगण्याच्या प्रवाहातील उलट दिशा आहे असे असले तरी वैवाहिक जीवनातील भेसुरता संपविण्याचा तो कायदेशीर मार्ग आहे .

**कुटुंबावर होणारे दुषपरिणाम -**

विवाहामुळे दोन भिन्नलिंग व्यक्ती एकत्र येतात असे नव्हे तर दोन मने, दोन कुटुंब एकत्र येतात घटस्फोटामुळे कुटुंब विखुरले जाते त्याचा सर्वात मोठा फटका मुलांना बसतो त्यांना दोन्ही पालकांचे प्रेम आणि मार्गदर्शन मिळत नाही त्यांच्या मानसिक आरोग्यावर तसेच वाढ व विकासावर दीर्घकाळ परिणाम होतो . आज नवविवाहित जोडपी घटस्फोटाचा निर्णय कुटुंबातील व्यक्तींशी संवाद न साधताच घेत असतात , पटत नाही तर घ्या घटस्फोट अशी परिस्थिती निर्माण झाली आहे समाज माध्यमावरील लेख , माहिती , ब्रेकअप च्या पोस्ट , मालिका , रिल्स यातून व्यक्तीला अनावशक् मदत घटस्फोट घ्यायला मिळत असते. समाज माध्यमावरील घटस्फोटाच्या चर्चामुळे नात्यांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण होते. यामुळे अनेकांना लग्न या संस्थेवरील विश्वास उडाला असून आजच्या समाजात अविवाहित व्यक्तींचे प्रमाण वाढले आहे . घटस्फोटाची प्रक्रिया अत्यंत तणावपूर्वक असते समाज माध्यमावरील नकारात्मक प्रतिक्रिया आणि चर्चा यामुळे मानसिक ताण वाढतो त्यामुळे व्यक्ती निराश् , चिंता इतर मानसिक समस्यांनी ग्रासली जाते महिलांमध्ये आत्मग्लानी , न्यूणगंड आणि आर्थिक सुरक्षिततेची भीती निर्माण होते तर पुरुषांमध्ये उदासीनता, राग अथवा व्यसनाच्या आहारी जाण्याकडे कल वाढतो. मुलांवर मानसिक दबाव येतो आर्थिक समस्या निर्माण होतात व पुढे त्यांच्या भविष्यात नात्यांचे तुटलेपणा त्यांच्या स्वतःच्या वैवाहिक जीवनात अनुभवण्याची शक्यता अधिक पटीने वाढते मुलांच्या विकासावर कौटुंबिक परिवाराचा ठसा प्रामुख्याने पडत असतोघरी जे वातावरण प्राप्त होते त्यातून मुलांच्या सामाजिक विकासाला निश्चित दिशा प्राप्त होतेह्या प्रत्यक्ष प्रभावाबरोबरच आई-वडिलांकडून जे आनुवंशिक वैशिष्ट्ये मुलाकडे संक्रमित झालेली असतात त्यांना अनुसरून मुलांच्या विकासाची क्षमता निर्धारित होतेआई-वडील आणि मुलांचे अनेक प्रकारे परस्परांशी संबंध येतात आणि नित्यशा संपर्कातून एकमेकांशी त्यांच्या विचारांची देव घेऊन होत

असतेत्यामुळेच मुलांच्या सामाजिक विकासात आई-वडिलांचा अत्यंत महत्त्वाचा प्रभाव पडत असतो . समाज माध्यमांमुळे सध्या घटस्फोटाचे प्रमाण बरीच वाढले आहे दुसऱ्याचे आयुष्याशी व्यक्ती तुलना करू लागला आहे . आपल्यापेक्षा दुसऱ्या व्यक्तीचे आयुष्य जगण्याची पद्धत सामाजिक प्रतिष्ठा त्याचे उच्च राहणीमान आकर्षक पद्धतीने साजरी केल्या जाणारे सोहळे , मेजवान्या , ट्रॅव्हलिंग ,पार्ट्या इत्यादी गोष्टी आपण सतत समाज माध्यमांवर पाहत असतो तेव्हा दुसऱ्याच्या आयुष्यातील आनंदाचे क्षण पाहून त्यांना आपल्या जगण्यात काहीतरी कमी आहे असे न्यूणगंड व्यक्तीला वाटत असते जीवनसाथी बद्दल नाराजी , असमाधान आणि अपेक्षाभंग वाटायला लागतो . दुसऱ्याचा पती खूप काळजी घेणारा आहे रोमँटिक आहे याची जाणीव पत्नी स्वतःलाच करून देतात तर पुरुष दुसऱ्यांच्या बायकांनी केलेली तयारी त्यांचा मोहक पोशाख व दागिने घालण्याची पद्धत, त्यांच्या आर्थिक स्वावलंबन , आत्मनिर्भयतेने अधिकच घायाळ होतात व आपल्या बायको पेक्षा दुसऱ्याची बायको किती चांगली आहे असे मत करतात व अशा तुलनेतूनच वाद निर्माण होतात त्यामुळे एकाच घरात राहत असून दोघेही मनाने खूप दूर जातात त्यांचे कारण दोघेही मोबाईलवर असतात दोघात कुठलाच संवाद नाही शारीरिक जवळीक नाही फक्त माध्यमांच्या सहाय्याने विचारांची व भावनांची देवाणघेवाण इतकीच असते . त्यामुळे भावनिक ओलावा संपून जातो समाज माध्यमांमुळे जग जवळ आले आहे असे म्हटले जाते त्यामुळे जुनी मित्र मैत्रीण संबंध पुन्हा प्रस्थापित होते किंवा नवीन विवाहबाह्य संबंध प्रस्थापित करणे सोपे झाले आहे . चॅटिग , ॲप्स , डेटिंग ,साईट्स आणि इतर समाज माध्यम प्लॅटफॉर्ममुळे असे संबंध लपविणे शक्य झाले आहे . ज्यामुळे विश्वासघात व घटस्फोटा चे प्रमाण वाढले आहे .समाज माध्यमावर केलेली मैत्री फोटो टॅग , कमेंट्स हे दुसऱ्या जोडीदाराला संशयास्पद वाटायला लागतात पूर्वी संवाद प्रत्यक्ष भेटीतून , पत्राद्वारे किंवा फोनद्वारे होत असे आता मेसेज , चॅट , स्टेटस , इमोजी ,व्हाट्सअप कॉल , व्हिडिओ कॉल , फेसबुक इत्यादीचा वापर वाढला आहे या माध्यमांची होणारी सुविधा चांगली आहे पण मेसेजेस किंवा चॅट चुकीचे संदर्भ आणि गोष्टी व्हाट्सअप ग्रुपवर सहजपणे पाठविल्या जातात यावर दुसऱ्या मित्र-मैत्रिणीच्या प्रतिक्रिया अशा प्रकारच्या गैरसमजुतींना जन्म देऊ शकतो वास्तविक वैयक्तिक संवादा ऐवजी समाज माध्यमांवर मुक्तपणे व्यक्त होण्याची मुभा व व्यक्ती स्वातंत्र्याची वाढलेल्या संपर्काने आपल्या जीवनसाथी बद्दलचे गैरसमज , असमाधान व अविश्वास वैवाहिक आयुष्यात मर्यादा ओलांडीत वाढीस लागला आहे . ज्यामुळे जोडीदाराबरोबर असलेल्या संबंधावर ताण येऊ शकतो . आपल्या वैयक्तिक आयुष्यातील प्रत्येक गोष्ट समाज माध्यमांवर शेअर करतात यामुळे जोडीदाराला गोपनीयता भंग झाल्यासारखे वाटते वैवाहिक जीवनातील छोटे छोटे वाद किंवा भांडणे समाज माध्यमांवर पोस्ट करणे हे देखील नात्यांसाठी हानिकारक ठरते .

**यावर उपाय म्हणून :-**

समोरचा माणूस जेव्हा निराश असतो तेव्हा त्याची ऊर्जा खूप कमी असते हळू आवाजात बोलणे होते अशावेळी संवादाची गरज भासते ह्या करिता विवाह समुपदेशकाची मदत घ्यावी व पती-पत्नींनी एकमेकांशी संवाद करून स्वतःच्या तक्रारी, कौतुक, इच्छा भविष्यातील योजना याविषयी मनमोकळया गप्पा माराव्यात तसेच समाज माध्यमांच्या वापरासाठी निश्चित सीमारेषा ठरवावी एकत्र वेळ घालवताना जसे रात्रीच्या जेवणाच्या वेळी, झोपताना, सकाळी उठल्यावर, संध्याकाळी समाजमाध्यमांचा अनावश्यक वापर टाळावा . समाजमाध्यमांवर आपली व वैयक्तिक जोडीदारातील सहसंबंधाचे फोटो, वैयक्तिक माहिती कुठली टाकावी अथवा टाकू नये याचे भान दोघांनीही ठेवले पाहिजे. वैवाहिक आयुष्यात बरेच उतार चढाव येत असतात ज्यात मुलांची होरपळ होत असते अशावेळी पती-पत्नीतील तणावाच्या संबंधाचा मुलांवर परिणाम होऊ नये यासाठी समाज माध्यमांच्या वापरातून वेळ काढून मुलांसोबत फिरायला जावे त्यांच्या शालेय कार्यक्रम तसेच शैक्षणिक कार्यात सहभागी व्हावे . वयात येणाऱ्या पाल्यांना त्यांची जबाबदारी समजावून सांगावे सामाजिक भानाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करावे प्रसारमाध्यमांच्या कारणाने होणाऱ्या घटस्फोटाच्या तणावपूर्ण वातावरणात पती-पत्नीच्या कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तींनी अशा दांपत्यांना समाज माध्यमातील दोष समजावून सांगावे व त्या व्यक्तीच्या सकारात्मक वर्तनात व विचारात भर घालण्याची भूमिका पार पाडावी ही अपेक्षा वडीलधाऱ्यांन करून ठेवली जावे .वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशनाचे अधिक गरज आहे ज्यामध्ये समाजशास्त्रज्ञ मानसोपचार तज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते , डॉक्टर आणि नातेवाईक यांचा समावेश असावा न्यायालयाने तसेच इतर सामाजिक संस्थांनी समेट घडवून आणण्यासाठी चांगले आणि मोठे प्रयत्न केले पाहिजेत दुसऱ्या शब्दात सरकार आणि समाज दोघांनाही समग्र दृष्टिकोनाची आवश्यकता आहे .

**संदर्भ सूची :**

विवाह आणि कोटुंबिक संबंध - प्रा. त्रिवेणी फरकाडे व सौ सुलभा गोंगे

मानव विकास - प्रा. सौ लीना कांडलकर

एडजुला लिगल्स गुगल्स ॲनालिटीक 2025 अहवाल

कम्प्यूटर्स इन ह्युमन बिहेवियर नियतकालिक

महिलांसंबंधी कायदे बातचित - पुष्पा रोडे